नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १०२ Issue - 102 | वार शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ Blow- Friday Date 29 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठवाड्यात तूफान पाऊस; वाहतूक बंद

## नांदेड, लातूरमध्ये पाणीच पाणी, गावांचा संपर्क तुटला; नद्या-नाले दुथडी भरून वाहताहेत...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गणेशोत्सवाचे आगमन होताच यंदाही पावसाने हजेरी लावली असून गेल्या ४-५ दिवसांपासून उघडीप दिलेला वरुणराजा आज पुन्हा कोसळला आहे. मुंबईसह मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातही पावसाच्या सरी बरसल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात गेल्या १० दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने मोठं नुकसान झालं असून लातूरमध्येही पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. लातूर जिल्ह्यात मागील सोळा तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील दहापेक्षा अधिक मार्गावर वाहतूक ठप्प झाली आहे. अरुंद आणि कमी उंचीच्या पुलांवरून पाणी वाहत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून वाहतूक बंद करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि लातूर जिल्ह्यातही आज पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे, सकाळपासून सूर्यदेवाचे दर्शन दूर राहिला. लातूर जिल्ह्यातील १० पेक्षा अधिक मार्गावर वाहतूक ठप्पा झाली असून बोरगावचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. येथील लेंडी नदीच्या पुलावरून पाणी जात असून गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे, तसेच शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले आहे.

उदगीर मुक्रमाबाद वाहतूक बंद, पुलावरुन पाणी

उदगीर मुक्रमाबाद रस्त्यावरील धडकनाळ या ठिकाणच्या अरुंद कठडे नसलेल्या पुलावरून पाणी जात असल्याने वाहतुकीसाठी तो पूल बंद करण्यात आला आहे. मागील १६ तासापासून सातत्याने होत असलेल्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झालं आहे. शेत शिवारात पाणी, नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत,. तसेच, अनेक गावातील सखल भागात पाणी गेल्याने जनजीवन विस्कळीत झाला आहे. लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या दहा अरुंद पुलावरून पाणीही जात असल्याने ते पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.



भंडाऱ्यात ४ बकऱ्या मृत्यूमुखी, महिला जखमी

भंडाऱ्यात आज आलेल्या मुसळधार पावसानं एका घराची भिंत कोसळली. या घटनेत एक गाय आणि चार शेळ्यांचा (बकऱ्या) मृत्यू झाला. तर एका महिलेसह एक गाय गंभीर जखमी झाली. ही घटना भंडाऱ्याच्या साकोली तालुक्यातील निलागोंदी या गावात घडली. गंभीर जखमी महिलेला तातडीनं साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तर ग्रामस्थ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीनं कोसळलेल्या भिंतीचा मलबा काढून मृत आणि जखमी जनावरांना त्यातून बाहेर काढून जखमी जनावरांवर उपचार करण्यात आले. वैशाली वंजारी (३५) असं गंभीर जखमी झालेल्या महिलेचं नावं आहे.

यवतमाळ जिल्ह्यात जोर'धार' पाऊस

आठ ते दहा दिवसांच्या उघाडीनंतर यवतमाळ जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह जोर'धार' पावसाने हजेरी लावली आहे. आज सकाळपासून ढगाळी वातावरण होते, तर अडीच वाजताच्या सुमारास अचानक जोरधार पावसाने हजेरी लावली. पडलेला पाऊस कपाशीसाठी काहीसा फायदाचा ठरत असला तरी सोयाबीन आणि तूर या पिकांना अतिपाण्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

# 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.

नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता

शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.



## ई मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

गणेशमंडळांकडून व्यापक जनजागृती

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत.

आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

# पंजाबला पुराचा तडाखा, दक्षिण भारतातही पाऊसजोर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वृत्तसंस्था, चंदीगढ/ नवी दिल्ली : पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात पुराचा तडाखा बसला असून, पठाणकोट, गुरुदासपूर, फाजिल्का, कपूरथळा, तरनतारन, फिरोजपूर, होशियारपूर आणि अमृतसर या जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने मदतकार्य सुरू केले आहे. दरम्यान देशातील दक्षिण भारतातील राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढल्याचे चित्र आहे.

'पूरग्रस्त भागातील शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. गुरुदासपूरच्या डाबुरीमध्ये, जवाहर नवोदय विद्यालयात पुरामुळे अडकलेल्या ३८१ विद्यार्थ्यांना आणि ७० शिक्षकांना वाचवण्यात आले,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी गुरुदासपूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागांना भेट दिली. मदत साहित्य पोहोचवण्यासाठी राज्य सरकारचे हेलिकॉप्टर वापरण्याची सूचना त्यांनी केली. रावी नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने डाबुरी परिसर पाण्याखाली गेला आणि शाळेच्या आत चार ते पाच फुटांपर्यंत पाणी आले.

केरळमध्ये गुरुवारी पावसाचा जोर वाढल्याने धरणांच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आणि राज्याच्या काही भागांत भूस्खलन झाले. भारतीय हवामान खात्याने (आयएमडी)हेॉ एर्नाकुलम, त्रिशूर, कोळिकोड, वायनाड, कन्नूर आणि कासारगोड या सहा जिल्ह्यांमध्ये ऑरेंज लर्ट जारी केला आहे. पठाणमथिट्टा, इडुक्की, पलक्कड आणि मलप्पुरम या पाच जिल्ह्यांमध्येही दिवसभर यलो लर्ट जारी करण्यात आला होता.

कर्नाटकच्या अनेक भागांत गुरुवारी सकाळी मुसळधार पाऊस पडल्याने 'आयएमडी'ने विविध जिल्ह्यांमध्ये ऑरेंज आणि यलो लर्ट जारी केला. शैक्षणिक संस्थांसह आणि अधिकाऱ्यांना अनेक जिल्ह्यांमध्ये खबरदारीच्या उपाययोजना करण्यासाठी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, तेलंगणातील कामरेड्डी जिल्ह्यात गुरुवारी मुसळधार पावसामुळे अनेक भागांसह शेतात पाणी शिरले. पावसामुळे जलसाठे भरून वाहत असून अनेक गावांचा संपर्क तुटला.

काश्मीरमधील पूरस्थितीचा धोका गुरुवारी कमी झाला, हवामान सुधारल्याने झेलम नदी आणि इतर जलसाठ्यांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली. गेल्या १२ तासांत काश्मीर खोऱ्यात कमी पाऊस पडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. जम्मू स्थानकावरून नवी दिल्लीसाठी एक विशेष अनारक्षित रेल्वे उपलब्ध करून देण्यात आली.

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गंगा नदीची पातळी वाढल्याने वाराणसीतील सर्व घाटांवरील आरत्या आणि अन्य धार्मिक विधींना फटका बसला आहे. वाराणसीत गुरुवारी गंगा नदीने ७०.२६२ मीटर ही धोक्याची पातळी ओलांडली. सध्या ती ७०.९१ मीटर पातळीवर असून, धोकादायक पातळीच्या (७१.२६२) जवळ आहे, असे जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सांगितले. 'गंगा नदीच्या पुरामुळे दशाश्वमेध घाटाचा खालील भाग पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे शेजारच्या इमारतीच्या छतावर दैनंदिन धार्मिक विधी करावे लागत आहेत', असे 'गंगा सेवा निधी' या संस्थेने म्हटले आहे.

# मुंबई उच्च न्यायालयात आणखी १४ न्यायमूर्तींची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयात आणखी १४ न्यायमूर्तींची नियुक्ती करण्यात आली आहे. वकिलांमधून निवड करून सर्वोच्च न्यायालयाने शिफारस केलेल्या १४ वकिलांची अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती करणारी अधिसूचना केंद्र सरकारने राष्ट्रपतींच्या संमतीनंतर बुधवारी प्रसिद्ध केली. या १४ न्यायमूर्तींमध्ये हितेन शामराव वेणेगावकर, संदेश दादासाहेब पाटील, श्रीराम विनायक शिरसाट व आशिष सहदेव चव्हाण यांचा समावेश आहे.

मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्तींच्या मंजूर पदांची संख्या ९४ असून सद्यस्थितीत ६९ पदे सध्या भरलेली आहेत. आता नव्या १४ न्यायमूर्तींमुळे ही संख्या ८३ होईल. मात्र, मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाली असून ते लवकरच पदभार स्वीकारतील. त्यामुळे एक पद रिक्त होईल. परिणामी सद्यस्थितीत एकूण कार्यरत न्यायमूर्ती ८२ होणार असून केवळ १२ पदे रिक्त असतील. उच्च न्यायालयातील वाढते व प्रलंबित खटले व प्रकरणांमुळे मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींच्या रिक्त पदांचा प्रश्न वर्षानुवर्षे चर्चेत राहिला आहे. मात्र, आता प्रदीर्घ काळानंतर प्रथमच न्यायमूर्तींची संख्या ही ८२ पर्यंत गेली असून उर्वरित १२ पदेही लवकरात लवकर भरण्यात यावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

भारत सरकारनं आखली मोठी योजना

अमेरिकेच्या कराचा कोणताही परिणाम होणार नाही

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांचा सामना करण्यासाठी भारताची खेळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर अमेरिकेने भारतावर २५ टक्के अतिरिक्त कर लादला आहे, त्यानंतर भारताने या करावर मात करण्यासाठी एक उत्तम योजना आखली आहे. प्रत्यक्षात, ट्रम्प यांच्या कराचा भारतातील कापड उद्योगावर सर्वात जास्त परिणाम होणार आहे. ज्याचा सामना करण्यासाठी भारताने योजना तयार केली आहे. भारतीय उत्पादनांवर अमेरिकेने लादलेले अतिरिक्त २५ टक्के शुल्क आजपासून म्हणजे २७ ऑगस्टपासून लागू झाले आहे. आता ५० टक्के सीमाशुल्क लादण्याच्या दरम्यान कापड निर्यातीला चालना देण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला आहे.

कापड उद्योग वाचवण्यासाठी आणि कपड्यांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी सरकारने ४० देशांशी संपर्क साधण्याची योजना आखली आहे. एका सरकारी अधिकाऱ्याने बुधवारी (२७ ऑगस्ट २०२५) ही माहिती दिली. या उपक्रमांतर्गत ब्रिटन, जपान, दक्षिण कोरिया, जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, नेदरलँड्स, पोलंड, कॅनडा, मेक्सिको, रशिया, बेल्जियम, तुर्की, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या प्रमुख देशांचा समावेश करण्यात आला आहे.

अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, भारत या ४० बाजारपेठांमध्ये कापड उत्पादनांचा विश्वासार्ह, दर्जेदार, शाश्वत आणि नाविन्यपूर्ण पुरवठादार बनण्याच्या दिशेने काम करेल. भारतीय मिशन आणि निर्यात प्रोत्साहन परिषदा (ईपीसी) यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतील. जरी भारत आधीच २२० हून अधिक देशांमध्ये कापड निर्यात करतो, तरी हे ४० देश एकत्रितपणे सुमारे ५९० अब्ज डॉलर्सचे जागतिक कापड आणि कपडे आयात करतात. या आयातीत भारताचा वाटा सध्या पाच ते सहा टक्के आहे. अशा परिस्थितीत, या देशांशी विशेष संपर्क साधण्याचा हा उपक्रम बाजारपेठ विविधीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा पाऊल ठरणार आहे. अमेरिकेने भारतीय उत्पादनांवर लादलेले अतिरिक्त २५ टक्के शुल्क २७ ऑगस्टपासून लागू झाले आहे.

ट्रम्पच्या शुल्कामुळे कापड, रत्ने आणि दागिने, चामडे, मासे, रसायने आणि यंत्रसामग्री यासारख्या क्षेत्रांच्या निर्यातीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. केवळ कापड क्षेत्राचे अमेरिकेला होणारे निर्यात नुकसान १०.३ अब्ज डॉलर्स असू शकते. ॲपेरल एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल (एझ़उ) चे सरचिटणीस मिथिलेश्वर ठाकूर म्हणाले, उद्योगाने आधीच २५ टक्के शुल्क दर स्वीकारला होता, परंतु आता अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केल्याने, बांगलादेश, व्हिएतनाम, श्रीलंका, कंबोडिया आणि इंडोनेशियासारख्या देशांच्या तुलनेत भारताची स्पर्धात्मकता ३० ते ३१ टक्क्यांनी कमी झाली आहे. यामुळं, भारतीय कापड उद्योग अमेरिकन बाजारपेठेतून जवळजवळ बाहेर पडला आहे.

## सरकारकडून तात्काळ आर्थिक मदतीची मागणी

सरकारकडून तात्काळ आर्थिक मदतीची मागणी केली जेणेकरून उद्योग संकटातून बाहेर पडू शकेल. कापड उद्योग आता ब्रिटन आणि एत्रऋ देशांसोबत व्यापार करारांद्वारे तोटा भरून काढण्यासाठी शक्यता शोधत आहे. सरकारच्या योजनेअंतर्गत, एझउ निर्यात बाजारपेठांचे मूल्यांकन करतील आणि उच्च मागणी असलेल्या उत्पादनांची ओळख पटवतील. सुरत, तिरुपूर, भदोही सारख्या कापड उत्पादन क्लस्टरना आंतरराष्ट्रीय संधींशी जोडले जाईल. तसेच, 'ब्रँड इंडिया' मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय प्रदर्शने आणि व्यापार मेळ्यांमध्ये सहभाग देखील सुनिश्चित केला जाईल. मुक्त व्यापार करार आणि व्यापार करार भारतीय उत्पादने स्पर्धात्मक बनविण्यात मदत करू शकतात. अशा परिस्थितीत, हे धोरणात्मक प्रयत्न भारतासाठी जागतिक कापड निर्यात बाजारपेठेत आपले स्थान मजबूत करण्याची संधी बनू शकतात.



## संपादकीय....

# आरोग्याचा श्रीगणेशा

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे. शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत. नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे. गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिन : ध्यानचंदचं अढळ स्थान !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राष्ट्रीय क्रीडा दिन हा विविध देशांमध्ये राष्ट्रीय क्रीडा संघ आणि त्या देशांच्या क्रीडा परंपरांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे. या दिवशी विविध वयोगटातील लोक खेळांमध्ये भाग घेतात. दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. ध्यानचंद या दिवशी जन्मलेल्या सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक. हा दिवस भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये तीनदा सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या आत्मचरित्र 'गोल्स' नुसार त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत १९२६ ते १९४९ मध्ये ९०० गोल केले. त्यांनी त्यांच्या घरच्या आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८५ सामन्यांमध्ये ५७० गोल केले. १९५६ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण, भारतातील तिसरा-सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला, त्याच वर्षी ते मेजर पदासह सैन्यातून निवृत्त झाले.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील खेळ जगतातला सर्वात उच्च पुरस्कार आहे. ध्यानचंद पुरस्कार अधिकृतपणे क्रीडा व खेळांमधील 'ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार' हा खेळ जगतातील आजीवन कर्तृत्वासाठीचा भारतीय सरकार तर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. १९२६ ते १९४८ या काळातील २० वर्षांपेक्षा जास्त कारकिर्दीत १००० पेक्षा अधिक गोल नोंदविणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांच्या नावावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्रीडा व युवा मंत्रालयाद्वारे सादर केला जातो. पहिला पुरस्कार हा २००२ साली देण्यात आला होता. ह्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी होते शाहूराज बिराजदार (मुष्टियुद्ध), अशोक दिवाण (हॉकी) आणि अपर्णा घोष (बास्केटबॉल). दरवर्षी हा पुरस्कार ३ ते ५ खेळाडूंना देण्यात आला आहे.




राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आम्ही भारतीय खेळाडूंच्या कर्तृत्वाचा गौरव करतो आणि आपल्या संस्कृतीतील खेळांच्या मूल्याबद्दल जागरुकता निर्माण करतो. याशिवाय मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा आणि भारतीय खेळांसाठीच्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात अनेक क्रीडा उपक्रम होतात. वय, लिंग किंवा क्षमता पातळी विचारात न घेता, कोणीही या इव्हेंटमध्ये सहभागी होऊ शकतो. लोकांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हे ध्येय आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी प्रमुख ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केले जातात. ज्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केली आहे ते ही पारितोषिके मिळविण्यास पात्र आहेत, जे भारतीय क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठे सन्मान आहेत.

आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद हे दिग्गज होते. १९२८, १९३२ आणि १९३६ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताच्या पहिल्या ऑलिम्पिक हॅट्ट्रिकमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ध्यानाला चांद म्हणून ओळखले जात असे कारण तो दिवसभराच्या नियमित कामानंतर रात्री हॉकीचा सराव करत असे. त्याच्या कलेबद्दलचे समर्पण दाखवून खेळाडूंचे आश्चर्यकारक पराक्रम आणि त्यांचा समाजावर खोल प्रभाव, त्यांच्या वचनबद्धतेची आणि अपवादात्मक कामगिरीची आठवण करून देणारा हा महत्त्वाचा दिवस आहे. क्रीडा जगतात अमिट छाप सोडणाऱ्या खेळाडूंनाही हा दिवस श्रद्धांजली अर्पण करतो.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा थलेटिसिझम, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीचा देशव्यापी उत्सव असल्याचे वचन देतो. दिवंगत भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना सन्मानित करणाऱ्या या वार्षिक सोहळ्यात, सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्यासाठी खेळाचे महत्त्व मान्य करण्यासाठी देशभरातील समुदाय एकत्र येतील. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन तीन दिवसीय फिटनेस चळवळ म्हणून साजरा केला जाईल, ज्याचे नेतृत्व फिट इंडिया मिशन करेल. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या मूल्यावर भर देण्यासाठी या वर्षीच्या उत्सवाचा भाग म्हणून अनेक रोमांचकारी कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय क्रीडा दिन हा खेळाडूंच्या भावनेचा आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वाचा उत्सव आहे. संघटित होण्याची, आमच्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची आणि क्रीडा नायकांच्या आगामी पिढीला प्रेरित करण्याची ही वेळ आहे.

त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, भारताने २०१२ मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनाची स्थापना केली. क्रीडा नायकाला श्रद्धांजली अर्पण करणे आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यावर भर देऊन, दैनंदिन जीवनातील खेळांच्या मूल्याबद्दल जनजागृती करणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहेत. या दिवशी, प्रमुख क्रीडा तारे भारताच्या राष्ट्रपतींकडून खेलरत्न, अर्जुन, द्रोणाचार्य आणि ध्यानचंद पुरस्कार यासारखे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त करतात.

मेजर ध्यानचंद मैदानी हॉकीपटू हे आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट खेळाडू असल्याचे अनेकांचे मत आहे. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद येथे कुशवाह राजपूत कुटुंबात झाला. ते रामेश्वर सिंह आणि शारदा यांचे पुत्र होते. मूल सिंग आणि रूप सिंग हे ध्यानचंद यांचे दोन भाऊ. नंतरचे एक हॉकीपटू तसेच, फील्ड हॉकीमध्ये भारतासाठी स्पर्धा केली आणि १९३२ आणि १९३६ ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदके जिंकली. चंदच्या वडिलांनी ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा दिली, जिथे ते हॉकी संघाचे सदस्य होते. चंद त्याच्या अपवादात्मक चेंडू हाताळणी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध होते. या विजयांच्या पलीकडे, त्याचा प्रभाव १९२८ ते १९६४ दरम्यान झालेल्या आठ ऑलिम्पिकमध्ये दिसून येतो, जिथे भारताने सात वेळा फील्ड हॉकी स्पर्धा जिंकली.

राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम आणि शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांमध्ये उपक्रमांसह साजरा केला जातो. इव्हेंटमध्ये वारंवार मॅरेथॉन, शाळांमधील फिटनेस स्पर्धा, थलीट श्रद्धांजली समारंभ आणि फिटनेस आव्हाने यांचा समावेश होतो. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनाची अधिकृत थीम अद्याप घोषित झालेली नाही, परंतु 'शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळ' आणि 'एक तास, खेळाच्या मैदानावर' या सारख्या थीमचा उल्लेख वेगवेगळ्या स्त्रोतांमध्ये केला जात आहे. ही थीम थलेटिक्स सामाजिक बंधने कशी मजबूत करू शकतात, व्यक्तींना एकत्र आणू शकतात आणि सर्वसमावेशकता आणि शांतता वाढवण्यासाठी समुदायांना आवश्यक असलेली साधने कशी देऊ शकतात यावर प्रकाश टाकते.



आज त्यांच्या १२० व्या जयंती निमित्त सर्वांना 'राष्ट्रीय क्रिडा दिनाच्या' हार्दिक शुभेच्छा !

जीवनाच्या या पथा-
वर, थांबला तो संपला।
राहिला चालत निरंतर,
तोच येथे जिंकला।।

**– प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी :९९२३६२०९१९**

## जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विकास कामांचा आढावा

# शासनाच्या योजना प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा : पालकमंत्री मेघना बोर्डीकर




- **प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करा**
- **पूर परिस्थितीत नागरिकांनी सतर्क रहावे**
- **मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करा**
- **शहर व गावांमध्ये स्वच्छता मोहिमेवर भर द्यावा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परभणी (जिमाका): शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून नागरिकांचे जीवन सुकर करावे. तसेच प्रत्येक विभागाकडे असलेल्या प्रलंबित कामांचा तात्काळ निपटारा करावा, अशा सूचना राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत केल्या.

यावेळी जिल्हाधिकारी संजय चव्हाण, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परषिदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीषा माथुर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर उपस्थित होते.

प्रारंभी पालकमंत्री यांनी जिल्ह्यातील पूर परिस्थिती आणि पीक व इतर नुकसानीचा आढावा घेतला. जिल्ह्यातील धरणातून पाणी सोडताना नदीकाठच्या गावांना वेळोवेळी सूचना देण्यात याव्यात. जेणेकरुन दुर्दैवी घटना टळतील. प्रशासकीय यंत्रणेने सतर्क राहून नागरिकांना खबरदारीचे उपाय सांगावेत, अशी सूचना पालकमंत्री यांनी संबंधित यंत्रणेला केली.

याशिवाय नैसर्गिक समतोल राखण्यासाठी जिल्ह्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी. शाळांना संरक्षित भिंती बांधून त्याभोवती काटेरी करवंदाची रोपे लावण्याच्या सूचनाही दिल्या. प्रत्येक शहर व गावात स्वच्छता मोहिम हाती घ्यावी. कृषी विभागाने फळबाग लागवड क्षेत्र वाढवावे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यात रस्त्यांची कामे दर्जेदार होतील याची दक्षता घ्यावी. दीडशे दिवसांच्या कार्यक्रमात सर्व विभागाने सहभागी होवून आपले कार्यालय स्वच्छ ठेवून जनतेचे कामे अधिक गतिमानतेने पूर्ण करावीत, आदी सूचना पालकमंत्री यांनी केल्या.

बैठकीत औद्योगिक ग्राहकांच्या वीज समस्या, जलजीवन मिशन, जनता दरबारातील प्रलंबित अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा, जिल्हा वार्षिक योजना, बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महानगर पालिका प्रशासन अंतर्गत कामांचा आढावा, नगरपालिका प्रशासन अंतर्गत कामांचा आढावा, वृक्ष लागवड आढावा, जिल्ह्यातील लघुसिंचन जलसंधारण विषयक कामे, पाझर तलावांच्या सुधारणा व दुरुस्ती करणे या विभागाचा सविस्तर आढावा त्यांनी घेतला.

यावेळी संबंधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

## एका आर्थिक वर्षासाठीच हा निधी देण्यासह पुढील काळातही आवश्यक ती तरतूद करण्यात येईल

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची घोषणा

# कृषी क्षेत्रात 'एआय' वापरासाठी या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपये

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : राज्यात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षीच्या अर्थसंकल्पात दोन वर्षासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. तथापि, या तंत्रज्ञानाचा फायदा आणि गरज पाहता सुरू असलेल्या एका आर्थिक वर्षासाठीच हा निधी देण्यासह पुढील काळातही आवश्यक ती तरतूद करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली.




श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना भवानीनगरमार्फत श्री छत्रपती मंगल कार्यालय येथे आयोजित शेतकरी मेळावा, त्याअंतर्गत 'ऊस शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावरील मार्गदर्शन आणि कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज जाचक, व्हाईस चेअरमन कैलास गावडे आदी उपस्थित होते.

प्रदर्शनाच्या व शेतकरी मेळाव्याच्या आयोजनाबद्दल कारखान्याने घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, जमिनीची घटती सुपीकता, खतांचा वाढता खर्च, पाण्याची कमतरता, उसाची घटती उत्पादकता, वातावरणीय बदल, घटता उतारा यामुळे शेतकरी आणि कारखाने अडचणीत आले आहेत. या एआय तंत्रज्ञानाच्या वापराने उसाच्या उत्पादनात ४० टक्क्यांवर वाढ झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे शेतीला किफायतशीर करण्यासाठी एआय तंत्रज्ञान 'गेमचेंजर' ठरणार आहे. उसासोबतच फळबागा, कापूस, सोयाबीन पिकासाठीही एआयच्या वापराची तयारी करण्यात येत आहे, असे त्यांनी नमूद केले.

वाढती लोकसंख्या, वाढते नागरिकरण, विकास कामांसाठी जमिनीचा वापर त्यामुळे शेतीसाठीची जमीन कमी होत असून, आहे त्या जमिनीत जास्तीचे उत्पादन काढल्याशिवाय देशाला आवश्यक कृषी उत्पादन मिळू शकणार नाही. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल, असेही ते म्हणाले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना आपल्या शेतात एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी हेक्टरी २५ हजार रुपये खर्च येणार असून त्यापैकी ९ हजार रुपये वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, साखर कारखाना पावणेसात हजार रुपये अग्रीम म्हणून देणार असून शेतकऱ्यांनी नऊ हजार रुपये भरायचे आहे. शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यातील शेतकऱ्यांचे ठिबकचे अनुदान यापुढे वेळेवर मिळेल यासाठी राज्य शासन प्रयत्नशील राहील. एआयच्या वापरासाठी ठिबक सिंचन आवश्यक आहे. हवामानात बदल होत असताना त्यावर मात करण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे, असे सांगून, उसाचे बियाणे दर तीन वर्षांनी बदलावे, जमिनीची सुपीकता घटू नये यासाठी तणनाशकांचा वापर टाळावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना परिसरातील रस्त्यांच्या विकासकामांकरिता १० कोटी रुपये देण्याची घोषणा त्यांनी केली. तसेच कारखान्याने रयत शिक्षण संस्थेला शाळा उभारण्यासाठी ८१ आर जमीन द्यावी. शाळा इमारत उभारणीसाठी ४ कोटी रुपयांची तरतूद ज्येष्ठ खासदार शरद पवार आणि रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून करण्याचे नियोजन आहे, असे त्यांनी सांगितले. कारखान्याला राज्य शासन, जिल्हा बँकेच्या स्तरावर मदत देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून आगामी काळातही कारखान्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी कृषिमंत्री श्री. भरणे म्हणाले, परिसरातील शेतकरी विविध पिकांचे चांगले उत्पादन घेत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी सोडवण्यासाठी, त्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक तो विचार करून कृषी विभागाच्या माध्यमातून निर्णय घेण्यात येतील. आता शेतीमधील पारंपरिक पद्धती बदलण्याची गरज आहे. खतांची, पाण्याची बचत कशी कमी होईल यासाठी एआयसारखे नवीन तंत्रज्ञान वापरावे लागेल. राज्यातील शेतकऱ्यांचे २०२४ - २५ चे ठिबकचे अनुदान देण्यात आले असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे चालू वर्षातील ५४ लाख रुपयांचे अनुदानही लवकरच देण्यात येईल. मध्यवर्ती संशोधन केंद्र पाडेगावला आवश्यक ती मदत करण्यात येईल, असे श्री. भरणे म्हणाले.

यावेळी मान्यवरांनी कृषी प्रदर्शनाची पाहणी केली. या प्रदर्शनात कृषी विभागाने आपल्या योजना, व्हीएसआय, विविध ठिबक संच उत्पादक, पाईप उत्पादक कंपन्या, ट्रॅक्टर तसेच अन्य कृषी यंत्रे, औजारे, ड्रोन तंत्रज्ञान, एआयसह अन्य आधुनिक तंत्रज्ञान पुरवठादार, अन्न प्रक्रिया स्टॉल आदी लावण्यात लावण्यात आले होते.

कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, आत्माचे प्रकल्प संचालक सूरज मडके, कारखान्याचे संचालक मंडळ, कृषी विभागाचे अधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे १५ ऑक्टोबर रोजी देशभर आंदोलन : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## रिपाइंच्या दोन दिवसीय विचारमंथन शिबिरात अनेक ठराव मंजूर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाबळेश्वर : खाजगी उद्योग क्षेत्रातील कंपनी आणि शिक्षण क्षेत्रातील स्वायत्त विद्यापीठे आदी सर्व खाजगी क्षेत्रात अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासांना आरक्षण धोरण लागू करावे.खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करावे या मागणी साठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने येत्या १५ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभर आंदोलन छेडण्यात येणार असल्याची घोषणा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज केली.महाबळेश्वर येथील हॉटेल ऐश्वर्या इनन मध्ये रिपब्लिकन पक्षाचे दोन दिवसीय विचारमंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्यात राज्यातील प्रमुख साहित्यिक आणि विचारवंत तसेच रिपाइं चे निवडक नेते या विचारमंथन शिबिरात उपस्थित होते.या शिबिराच्या समारोपा नंतर विचारमंथन शिबिरात झालेल्या विविध ठरावाची माहिती पत्रकारांना देताना ना.रामदास आठवले यांनी खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी रिपाइं तर्फे देशभर आंदोलनाची घोषणा केली.

आरक्षण हे संविधानाच्या अनुसूची ९ मध्ये समाविष्ट करून आरक्षणाचा कायदा संसदेत करण्यात यावा त्यामुळे सामाजिक आणि शैक्षणिक सर्व क्षेत्रात आरक्षणाला धक्का लागणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून अन्य राज्यांनी पदोन्नती मध्ये आरक्षण लागू केले असून महाराष्ट्रात ही पदोन्नती मधील आरक्षण लागू करावे; विनाअनुदानित तत्वावरील महाविद्यालयांना शाळांना अनुदान द्यावे .त्यासाठी कायम विनाअनुदानित हे तत्व शासनाने रद्द करून शाळा आणि महाविद्यालयांना अनुदान दिले पाहिजे; राज्यातील विद्यापीठांमध्ये एकही बौद्ध किंवा मागासवर्गीय कुलगुरू नाही त्यामुळे राज्यातील किमान दोन विद्यापीठांमध्ये योग्यताधारक बौद्ध दलित प्राध्यापकाला कुलगुरू पदावर निवड करावी.यासह विद्यार्थी ; झोपडीवासी; भटके विमुक्त आदी अनेक समाज घटकांना न्याय देणारे विविध विषयांचे २५ ठराव आज रिपब्लिकन पक्षाच्या विचारमंथन शिबिरात मंजूर करण्यात आल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

देशभरातील दलित मागासवर्गीय तरुणांनी सहकार क्षेत्रात मोठ्या संख्येने येण्याचे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले. महागाईच्या वाढत्या प्रमाणात विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.रिपब्लिकन पक्ष देशभरातील १४० कोटी जनतेच्या हिताचा विचार करणारा पक्ष आहे सर्व जाती धर्मियांना सोबत घेऊन जनतेच्या प्रश्नांवर आंदोलन उभारण्याचे काम करून रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपल्या पक्षाचा जनाधार वाढवावा.

ओबीसी आणि इ बी सी साठी उत्पन्न मर्यादा ८ लाख असून त्यात वाढ करुन उत्पन्नाची अट १२ लाख पर्यंत करण्यात यावी आदी अनेक ठराव या विचार मंथन शिबिरात रिपब्लिकन पक्षाने केले असून त्याचे निवेदन लवकरच मुख्यमंत्र्यांना देण्यात येणार आहे अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

यावेळी सौ.सीमाताई आठवले; रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे; संयोजक पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक गायकवाड; राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम ; रिपाइं चे युवक आघाडी राज्य अध्यक्ष पप्पू कागदे; प्रकाश लोंढे ; मिलिंद शेळके मातंग समाज आघाडी राज्य अध्यक्ष अण्णा वायदंडे; तसेच ज्येष्ठ साहित्यिक अच्युत माने ; ऋषिकेश कांबळे; पुराण मेश्राम; विजय खरे ; ड दिलीप काकडे ; प्रा विजय काळेबाग; अमर माने ;विजय साबळे ; प्रा शहाजी कांबळे परशुराम वाडेकर सूर्यकांत वाघमारे डॉ विजय मोरे ॲड. अशाताई लांडगे; सिद्धार्थ कासारे सौ शिलाताई अनिल गांगुर्डे ;अभया सोनवणे दयाळ बहादुर; सुरेश बार्शिंग; विजय वाकचौरे ; श्रीकांत भालेराव; अण्णा रोकडे; आदी मान्यवर उपस्थित होते.

## जि. प. शाळा बोपगांव येथील हर्षवर्धन राठोड याची इस्त्रो दौऱ्यासाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुरंदर::बोपगांव ता. पुरंदर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी तील विद्यार्थि हर्षवर्धन राठोड याची अंतराळ संशोधन संस्था इस्त्रो ( बँगलोर) येथील अभ्यासक्रम दौऱ्यासाठी निवड झाल्याची माहिती प्रभारी मुख्यध्या पिका सौ सुजाता पवार मॅडम यांनी दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी ही निवड केली आहे.बोपगांव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही १६७ पटसंख्या असलेली शाळा आहे. या शाळेत वेगवेगळे नाविन्यपुर्ण उपक्रम, पालक, आणि लोकसहभाग ग्राम पंचायतच्या सहकार्याने सतत परिश्रमाने या शाळेने आज प्रगती, गुणवत्ता आणि पटसंख्या वाढवली आहे.



शाळेतुन अंतिम मुलाखतीसाठी ४ मुलांची निवड झाली होती. त्यामध्ये हर्षवर्धन राठोड याची इस्रो (बेंगलोर )येथे अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. ग्रामपंचायत बोपगांव व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने हर्षवर्धन राठोड व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिकाणचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोपगावच्या सरपंच सौ सारिका गुरव, संदीप फडतरे सभापती नीरा कृषि उत्पन्न बाजार समिती, श्री योगेश नाना फडतरे मा स्वीकृत जि. प. सदस्य,प्रकाश भाऊ फडतरे संचालक नवनाथ देवस्थान, प्रकाश जगदाळे, काळू नाना पवार,चंद्रकांत (भाऊ )फडतरे, सर्जेराव जगदाळे, तुकाराम सेठ फडतरे, मा सरपंच रामभाऊ फडतरे, बबन तात्या जगदाळे,भाऊसाहेब फडतरे, विजू जगदाळे,श्री तानाजी फडतरे अध्यक्ष पुरंदर ता. शिक्षक संघ, सौ राखी ढगारे ग्रामविकास अधिकारी, श्री विनायक गायकवाड पोलीस पाटील, यांसह प्रभारी मुख्याध्यापिका सौ सुजाता अजित पवार, सौ रेणुका शेंडकर, सौ शुभांगी धुमाळ, सौ सारिका जगताप, सौ ज्योती जगताप, श्रीमती वैशाली शिंदे व विध्यार्थी उपस्थित होते.

## उद्योग उभारणीसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतीची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नविन संधि विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिललेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आहे. बेरोजगार उमेदवारांनी उद्योग उभारणीसाठी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असावे. दहा लाखांवरील उत्पादन उद्योग व पाच लाखांवरील सेवा उद्योगासाठी शिक्षण ८ वी पास, वार्षिक उत्पन्नाची अट नाही. वैयक्तिक, भागिदारी, वितीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट/संस्था सोसायटी स्वयंसहाय्यता बचत गट नविन उद्योगासाठी योजना लागू आहे. कुटुंबातील एक व्यक्तीस (पती किंवा पत्नी) लाभ घेता येईल. अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या व महामंडळाच्या योजनतून लाभ घेतलेला नसावा. .अर्ज करण्याची वेबसाईट https://maha-cmegp.gov.in

तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व इतर योजनांबाबत या कार्यालयात ऑनलईन प्रस्ताव निशुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यांत आली आहे. त्यासाठी कोणतेही शुल्क अथवा रक्कम आकारण्यात येत नाही. तसेच या योजनेसाठी जिल्हा उद्योग केंद्र सोलापूर कार्यालयातीलच अधिकृत अधिकारी व कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा. या कामासाठी बाहेरील खाजगी एजंट, दलाल, सल्लागार यांचेशी संपर्क करण्यात येऊ नये . या योजनेच्या कामाकरीता कोणत्याही खाजगी अथवा त्रयस्थ व्यक्तींची नेमणूक केलेली नाही.

याबाबत अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कार्यालय, एस. बी. आयकॉन कॉम्पलेक्स (तळमजला), किल्लेदार मंगल कार्यालयाचा बाजूस, अग्रेसन भवन समोर, आसरा चौक, होटगी रोड, सोलापूर, जि. सोलापूर, दुरध्वनी didic.solapur@maharashtra.gov.in येथे संपर्क करावा. असे आवाहन महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर यांनी केले आहे.

## लहान मुलांच्या भांडणावरून मारहाण; तिघांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : लहान मुलांच्या झालेल्या भांडणावरून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २७ ऑगस्ट रोजी सकाळी महाराणा प्रताप नगर सोलापूर येथे घडली. याप्रकरणी सोनाली अजय आंबेवाले (वय-२०,रा.म.प्रताप नगर, कुमठा नाका) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राज सुरज चौधरी,राजा सत्तारवाले व चुम्मा सत्तरवाले (सर्व राहणार म.प्रताप नगर,कुमठा नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या राहत्या घराच्या परिसरात राहणारे वरील संशयित आरोपी यांनी लहान मुलांच्या भांडणावरून तसेच मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी व सासू गंगा यांना हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करत धमकी दिली. तसेच राज चौधरी याने त्याच्या हातातील दगड घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मणूरे हे करीत आहेत.

## वागदरी येथून मराठा आरक्षण आंदोलक मुंबईकडे रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : मराठा आरक्षणाचा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली दी.२९ऑगस्ट २०२५ रोजी अझाद मैदान मुंबई येथे मराठ समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळले पाहीजे या प्रामुख मागणीसह अन्य मागण्या करिता आयोजित बेमुदत आंदोलनात सहभागी होण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील वागदरी ता. तुळजापूर येथून मराठा आंदोलक कार्यकर्ते वर्गणी करून खाजगी वहाने मुंबईला रवाना झाले आहेत.

प्रारंभी गावातील ग्रामदैवत मारुती मंदीरा समोर वहानसह कार्यकर्ते एकत्र येवून श्री राम भक्त मारूती रायाचे व गणपती बप्पाचे दर्शन घेवून गाडीचे (आयसर टॅम्पो ) चे पुजन करून माता भगिनीने औक्षण केले.त्या नंतर वागदरी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात येवून कार्यकर्त्यांनी आरक्षण आमच्या हक्काचं,नाही कोणाच्या बापाचं कोण म्हणतय देणार नाही, घेतल्या शिवाय राहणार नाही जय भवानी जय शिवाजी, एक मराठ लाख मराठा अशा घोषणा देत आंदोलनकर्ते कार्यकर्ते वर्गणी करून खाजगी वहानाने मुंबईकडे रवाना झाले. उपस्थित ग्रामस्थानी त्याना शुभेच्छा दिल्या.

यावेळी व्यंकट पाटील, ह.भ.प. राजकुमार पाटील,मदनराजे पाटील, किशोर सुरवसे, किशोर धुमाळ,अमोल पाटील, दत्ता सुखसे,दत्ता पाटील, ज्ञानेश्वर पाटील,रामचंद्र यादव,राजकुमार पवार, देविदास नागणे,बाबूराव बिराजदार, राजेंद्र पाटील, बाळू पवार, नागनाथ धुमाळ, नागनाथ वचनें सह कार्यकर्ते मोठ्य संखेने उपस्थित होते.



### महाविद्यालयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी व प्रबोधन शिबिराच्या उदघाटन

### डॉ. गौरी कहाते यांचे प्रतिपादन

## मासिक पाळीची स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी जागरूकता आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : भारतामध्ये सामाजिक-सांस्कृतिक निर्बंध, उत्पादनांची उपलब्धता नसणे आणि सुरक्षित सुविधांचा अभाव यामुळे अनेक मुलींना मासिक पाळी व्यवस्थापित करणे कठीण होते, ज्यामुळे आरोग्य समस्या आणि शिक्षणात अडथळे निर्माण होतात. ज्यामुळे आरोग्य समस्या आणि शिक्षणात अडथळे निर्माण होतात. मासिक पाळीची स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी जागरूकता, योग्य माहिती, सुरक्षित उत्पादने आणि पायाभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक स्त्री सन्मानाने आणि निरोगीपणे मासिक पाळी व्यवस्थापित करू शकेल. मासिक पाळीत पाय, कंबर, पोट दुखणे या तक्रारी निर्माण होऊ नये म्हणून नियमित व्यायाम, प्रोटीनयुक्त आहार याचे संतुलन ठेवणे आवश्यक आहे. मासिक पाळीत वेदनानाशक गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्याव्यात. केवळ घरकामाने व्यायाम होत नाही तर योगासने व सूर्यनमस्कार याचे महत्त्व आहे. उत्तम आहारामुळे हिमोग्लोबिनचे प्रमाण संतुलित ठेवता येते. शरीरात योग्य हिमोग्लोबिनचे प्रमाण असणे ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ डॉ. गौरी कहाते यांनी केले.




संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त), सोलापूर संचालित वुमन डेव्हलपमेंट सेल व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी व प्रबोधन शिबिराच्या उदघाटन प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा हे होते.

यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, वुमन डेव्हलपमेंट सेलच्या प्रमुख डॉ. मंजू संगेपांग, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्तिथ होते.

यावेळी डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, मुलींनी आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. मासिक पाळीकडे एक रहस्य म्हणून न पाहता एक नैसर्गिक प्रक्रिया म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन समाजात विकसित करणे आवश्यक आहे.अध्यक्षीय समारोप करताना डॉ. ऋतुराज बुवा म्हणाले की, विद्यार्थिनीने केवळ परीक्षेतील मार्कांचा विचार न करता हिमोग्लोबिन योग्य ठेवावे आणि तो केवळ उपक्रम म्हणून न ठेवता पुढे चालू ठेवावा हिमोग्लोबिन कमी असेल तर तो वाढवण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

आयोजित हिमोग्लोबिन तपासणी शिबिरात १२५ मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. प्रा. डॉ. संगीता कामत, प्रा. डॉ. कुंडलकेश गायकवाड, प्रा. डॉ. वैशाली अचकनळी, प्रा. डॉ.आरती दिवटे, प्रा. डॉ. शीला रामपुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. नभा काकडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नम्रता माने यांनी करून दिला. सूत्रसंचालन मानसी वाल्मिकी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. मंजू संगेपांग यांनी मानले.

# गारखेड येथील नागरिकांचे दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात

## ग्रामसेवकांच्या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थांना होतोय अस्वच्छ पाणीपुरवठा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील गारखेड येथील दोन ते तीन महिन्यांपासून पाईप लाईन लिकीज असल्याने. अशुध्द पाणी नागरिकांना पिण्यासाठी भाग पडत आहे . ग्रामसेवकांचे दुर्लक्ष व गारखेड येत नसल्याने वॉर्ड क्रमांक ३ मध्ये काही भागात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन लिकीज असल्याने गटारातील घाण पाणी त्यात मिसळून नागरिकांना अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होतो. त्यामुळे या परिसरातील जन आरोग्य धोक्यात आले आहे. पाईन लाईन दुरूस्त करून स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा, ग्रामसेवकांचे दुर्लक्ष आहे.ग्रामसेवक राजेंद्र मेहेत्रे.यांची गावाला दोन महिन्यांपासून.भेट सुध्दा नाही फोन सूध्दा उचलत नाही. फोन उचलला तरी ग्रामस्थासी उगरट भाषेत उत्तर देते .अशा या बेजबाबदार ग्रामसेवकावर योग्य ती कारवाई अशा मागणीची लेखी तक्रार रामप्रसाद लव्हेकर भाजपा ओबीसी मोर्चा चे रामप्रसाद लव्हकरे व स्थानिक नागरिकांनी सिंदखेडराजा पंचायत समिती चे ग ट वि क ा स अधिकारी घुगे यांच्याकडे तक्रार देऊन ही . पण अद्यापही ग्रामसेवक राजेंद्र मेहेत्रे यांनी पाईप लाईन दुर-स्ती करण्याची तसदी घेतली नाही. त्यामुळे नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा सुरूच आहे.गारखेड येथील वॉर्ड क्र. ३ मध्ये शेतातील रस्त्यालगत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन आहे. या पाईप लाईनच्या बाजूला खड्डा आहे . खड्ड्यात पाणी साचत असल्याने मुख्य पाईप लाईन लिकेज असल्यामुळे या खोल खड्ड्यातील घाणेरडे सांडपाणी पाईपमध्ये शिरून पिण्याच्या पाण्यात पाणी दूषित होत आहे. त्यामुळे सदर पाणी आरोग्यास हानीकारक झाले असून परिसरात हागवण, कॉलरा, इत्यादी जीवघेण्या रोगा-ची सार्वत्रिक साथ निर्माण होवून जनआरोग्य धोक्यात येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सदर गळकी पाईप लाईन दुरुस्ती करावी तसेच खोल खड्ड्यातील दूषित पाणी पाईप लाईनमध्ये जाणार नाही यासाठी उपाययोजना करून दूषित पाण्यावर पायबंद करावा याकरिता सिंदखेडराजा पंचायत समिती चे गटविकास अधिकारी यांना स्थानिक नागरिकांनी सह्यानिशी निवेदन दिले. पण अनेक दिवस लोटूनही या गंभीर समस्येकडे अद्यापही लक्ष दिले नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका वाढला आहे. सर्वाधिक आजार हे पाण्याद्वारे होत असतात. त्यामुळे नागरिकांना स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांना अधिकार आणि प्रशासनाचे आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे प्रशासनाने या बाबीची दखल घेत पाईपलाईन दुरुस्ते करावी अशी मागणी बुलढाणा जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष रामप्रसाद लव्हकरे.संदिप जर्नाधन इंगळे . राहुल मधुकर लव्हकरे.प्रकाश साहेबराव भालमोडे सोपान इंगळे ग्राम स्थ करीत आहे.

> **सिंदखेडराजा तालुक्यातील गारखेड येथील पाईप लाईन लिकीज असल्याने अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होत असून ग्रामसेवकांची दोन महिन्यांपासून गावात हजेरी नसल्याने . ग्रामसेवकांच्या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थांना अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होत असल्याने . नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे. गटविकास अधिकारी यांना तक्रार देऊन ही अद्याप अस्वच्छ पाण्याचा पुरवठा सुरू आहे.**
> **– रामदास लव्हकरे (जिल्हा उपाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्चा)**



**भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रामप्रसाद लव्हकरे यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार**



# भानुदास शिंदे यांची राष्ट्रवादी अजितदादा गटाकडून विविध राज्यांवर प्रभारी व निरीक्षकपदावर नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हडपसर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे राष्ट्रीय ओबीसी विभाग महासचिव भानुदास शिंदे यांची राष्ट्रीय ओबीसी विभाग अध्यक्ष उमाशंकर यादव यांनी मध्यप्रदेश प्रभारी,गोवा,बिहार राज्याचे निरीक्षक पद-ावर नुकतीच नियुक्ती केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि राष्ट्रीय सचिव ब्रिजमोहन श्रीव-ास्तव यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती झालेली आहे.या नियुक्तीबद्दल भानुदास शिंदे यांचे भारतातून आणि महाराष्ट्र,पुणे शहर,पुणे जिल्हा या विभागातून



राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या पदाधिकाऱ्यांकडून कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

आगामी काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभाग विविध राज्यांमध्ये तळागाळांमध्ये म जबूत करणार असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विधानसभेच्या निवडणुका यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा गटाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याकरता ओबीसी विभाग सर्वतो परिचय योगदान देईल असे प्रतिपादन भानुदास शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केले.

# अनंत चैतन्य प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी बनवल्या इको फ्रेंडली गणेशमूर्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील कल्पनाशक्तीचा व बुद्धीचा विकास व्हावा सोबतच आनंददायी शिक्षण मिळावे याकरिता प्रशालेच्यावतीने नेहमीच कृतीवर आधारित शिक्षणातंर्गत विविध उपक्रम राबवले जा-तात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा घेण्यात आली या कार्यशाळेत ५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्रारंभी प्रशालेचे प्राचार्य श्री. अशोक साखरे यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस चे दुष्परिणाम व पर्यावरणाच्या संवर्धनासाठी व



रक्षणासाठी भारतीय सण हे पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केल्याने होणारे फायदे याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी पर्यावरणपूरक गणपती बसवण्याचा संकल्प केला. प्रशालेचे कलाशिक्षक श्री. राजेंद्र यंदे यांनी या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. तर सांस्कृतिक सहाय्यिका सौ. मल्लम्मा चपळगाव, सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी सहाय्य केले. विद्यार्थी स्वतः आणलेल्या मातीपासून चिखल बनवून विविध आकाराच्या मूर्ती बनवल्या व रंगवून सुशोभित केल्या.यावेळी विद्यार्थी इको फ्रेंडली गणपतीची मूर्ती बनवण्यात व रंगवण्यात अगदी तल्लीन होवून गेले होते. याचवेळी क्राप्ट आर्ट गणपती चित्ररेखाटन कार्यशाळा ही घेण्यात आली. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी गणपती चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतानाच त्याला अतिशय कलात्मक व आकर्षक रुप देवून सुंदर आणि प्रभावी गणपतीची चित्रे तयार केली. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे,सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, छायाचित्र व प्रसिद्धी विभाग प्रमुख धनंजय जोजन, सहाय्यक शशिकांत अंकलगे, प्रा.रविंद्र कालीबत्ते,काशीनाथ पाटील, अब्दुलअझीझ मुल्ला यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रशालेतील या सृजनशील उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशा-लेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा.श्री.सिद्धेश्वर कल्याणशेट्टी , संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरद-ादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतकासह अभिनंदन केले.

**पर्यावरणपूरक गणेश निर्मिती कार्यशाळेत होता ५० विद्यार्थ्यांचा सहभाग**

# शिवसृष्टीमुळे पर्यटकांना इतिहासाची ओळख होण्यासह बारामतीचे सांस्कृतिक व पर्यटन महत्त्व अधिक वाढेल : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : कन्हेरी परिसरात शिवसृष्टीमुळे पर्यटकांना इतिहासाची ओळख आणि त्यातून प्रेरणा मिळेल. तसेच बारामतीचे सांस्कृतिक व पर्यटन महत्त्व अधिक वाढेल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी आज बारामती परिसरातील विविध विकास कामांची पाहणी केली. शिवसृष्टी, कन्हेरी वन उद्यान परिसर, तांदुळवाडी येथील वृद्धाश्रम तसेच तिरंगा चौकाची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.

श्री. पवार यांनी शिवसृष्टी या ऐतिहासिक थीम पार्क परिसरातील कॅनॉल शेजारील रस्त्याची पाहणी केली व सुधारित कामासाठी सूचना दिल्या. याठिकाणी छत्रपती शिवाजी म हाराजांच्या जीवन प्रवासाचे दर्शन घडवणाऱ्या अनेक भव्य प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. यामध्ये शिवकाळातील सदरा व आग्रा दरबार, शिवकालीन बाजारपेठा व राजसभा, राजगड प्रवेशद्वाराची प्रतिकृती, शिवकालीन आरमार आणि माहितीपट व थ्रीडी निमेशनद्वारे शिवकालीन युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

श्री. पवार यांनी बाराम तीच्या वनपरिक्षेत्र अंतर्गत उभारण्यात आलेल्या कन्हेरी वन उद्यान परिसरातील विकास कामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या संदर्भातील माहिती जाणून घेतली. यावेळी 'डव्हेंचर अँड नेचर क्लब'मार्फत साहसी खेळांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप झाला. याप्रसंगी १४ प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. अशा उपक्रम ांच्या माध्यमातून युवा वर्गाला रोजगाराच्या नव्या संधी उप-लब्ध होतील आणि बारामतीच्या पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



# विवाहितेच्या छळ प्रकरणी पतीसह पाच जणांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध सदर बझार पो-लीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २४ एप्रिल २०२४ ते २८ नोव्हेंबर २०२४ रोजी दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. याप्रकरणी प्रणाली आदित्य पाखरे (वय-२७,रा.शुक्रवार पेठ, लक्ष्मी मंदिर जवळ) यांनी सदर बझार पो-लीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती आदित्य, सासू जयश्री, दीर अजिंक्य, सासरे राधेशाम व जाऊ शारदा (सर्व.रा.मंजुषा नगर, विकास नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी या सासरी नांदत असताना वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना तुझ्या माहेरच्यांनी लग्नात मानपान केला नाही, तुला स्वयंपाक येत नाही, तुझे खानदान चांगले नाही.असे म्हणून जाऊ शारदा हिच्या माहेरच्या लोकांनी भरपूर सोने दागिने घातले आहे. तु तुझ्या आई-वडिलांकडून सोन्याचे दागिने घेऊन ये म्हणून व तसेच आदित्य याला कर्ज फेडण्यासाठी वडिलांच्या नावाची एफडी मोडून सात ते आठ लाख रुपये बाहेरून आण म्हणून शिवीगाळ करत मारहाण करून हाकलून दिल्याची फिर्याद प्रणाली पाखरे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

**विवेकानंद प्रतिष्ठान गणेशोत्सव व्याख्यानमाला - १**

**विनायक खोत यांचे प्रतिपादन**

# गड किल्ले स्वराज्याचे इतिहासाचे पराक्रमाचे शौर्याचे प्रतीक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ अक्कलकोट : गड किल्ले स्वराज्याचे इतिहासाचे पराक्रमाचे शौर्याचे प्रतीक आहेत . गडकिल्ले निगा संवर्धन गरज आहे . गड किल्ले कसे पहावेत का पहा-वेत कसे पहावेत गड किल्ले यांचे प्रकार आपल्या पुर्वाजांचे बलीद-ान यांचे स्मृती आठवण्यासाठी गडकिल्ले पहावेत . छत्रपती शिव-ाजी महाराज हे स्वराज्याचे पहिले क्रांतीकारी पुरुष आहेत . आपला हा इतिहास शौर्य मंदिरे सर्वांना सांगण्यास आपण कमी पडत आहोत . आपण हा इतिहास विसरत चाललो आहोत जे इतिहास विसरतात ते भविषय विसरतात भविष्य घडविण्यासाठी इतिहास माहित असणे तो साऱ्याना सांगणं गरजेच आहे. हा इतिहास सर्वांनां सांगण्याचे काम विवेकानंद प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी प्रतिष्ठान म ाध्यमातुन गणेशोत्सव व्याख्यानमाला आयोजित करून करीत आहेत हे गौरवाची बाब असल्याचे असे प्रतिपादन शिवाजी ट्रेल ट्रेल दुर्ग संवर्धन संस्था अध्यक्ष विनायक खोत यांनी केले . विवेकानंद प्रतिष्ठान संस्थापक यांच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेच्या प्रारंभी गुरुवारी पहिले पुष्प गुंफताना व्याख्याते विनायक खोत बोलत होते .

प्रारंभी गणेशोत्सव व्याख्यानमालेचा प्रारंभ दिपप्रज्वलन व प्रतिमा पुजन सुनिल गोरे, मोहन शिंदे, दामोदर शिंगे,गुरुपादप्पा आळगी,राजशेखर उबराणीकर, दत्त-ात्रय कटारे आदि मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आले .

> **महाराष्ट्रातील गड व किल्ले या विषयावर पहिले पुष्प गुंफताना रसिक श्रोत्यांनां एलईडी प्रेझेन्टेशनद्वारे व्याख्याते विनायक खोत यांनी महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची अक्षरक्षः भ्रमंतीच केली . रसिक श्रोते एक एक गड किल्ले एलईडी प्रेझेन्टेशनद्वारा पाहता असता गड किल्ल्याची इंतभुंत माहितीसह शिवरायांचा स्वराज्याच्या निर्मितीसाठी एक एक गड किल्ला स्वराज्याच्या निर्मातीत किती महत्वाचा आहे हे विशद केले . स्वराज्य प्राप्ती साठी दिलेला लढा शौर्य इतिहास प्रत्येक गड किल्ल्याचे महाराष्ट्राच्या इतिहासात महत्व श्रोत्यासमोर उभा केला .**

> **विवेकानंद प्रतिष्ठान गेली १३ वर्षापासून अक्कलकोटकरांसाठी विविध विषयावर नामवंत तज्ञ इतिहास अभ्यासक यांचे व्याख्यानाची मेजवानी देत आहे . व्याख्यानमालेचे हे १४ वे वर्ष आहे.**

व्याख्याते विनायक खोत यांचा परिचय कल्पना स्वामी यांनी करून दिला व्याख्याते दुर्ग किल्ले जत न संवर्धक. स्वच्छता चळवळीचे विनायक खोत यांचा सत्कार सम र्थाची प्रतिमा, शाल वृक्ष देऊन प्रतिष्ठानचे संचालक अशोक येणगुरे व मुकुंद उत्पात,आकाश पटांगळे आदि मान्यवरांचा प्रतिष्ठान वतीन सत्कार करण्यात आला .

याप्रसंगी मल्लीकार्जुन मसुती महाविर येणगुरे महेश कापसे विलास कोरे मनोहर चव्हाण प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी खंडेराव घाडगे सुत्र संचालक बापुजी निंबाळकर महेश वागदरे पप्पू मोरे शिवलिंगप्पा वाले अभिजित लोके ना-गेश कलशेट्टी चंद्रकांत दसले अशोक दंतकाळे निळकंठ कापसे विकास तळवार सिद्राम पाटील पत्रकार प्रशांत भगरे योगेश कबाडे अरविंद पाटील मारुती बावडे रमेश भंडारी नंदकुमार जगदाळे श्रीकांत झिपरे प्रतिष्ठानचे सदस्य श्रोते मोठ्या संख्याने उपस्थित होते .

